Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

यावल पोलिसांची मोहराळे गावात धडक कारवाई
(पान २ वर)



। बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक ११८। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

Selected

### SIR प्रक्रियेला मुदतवाढ

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यातील SIR प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे. अंतिम मुदत 17 ऑगस्टपर्यंत वाढवली आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रारूप मतदार यादी 24 ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. सर्व प्रक्रियेनंतर महाराष्ट्राची अंतिम मतदार यादी 27 ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. नागरिकांना प्रारूप मतदार यादींवर २३ सप्टेंबरपर्यंत दावे आणि हरकती दाखल करता येणार आहेत. प्राप्त दावे-हरकतींवर नोटिसा बजावणे, किंवा सुनावणी घेणे आणि त्यांचा निपटारा करण्याची प्रक्रिया २२ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. त्यामुळे प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आपले नाव आणि मतदार यादीतील तपशील तपासण्याचे केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मतदारांना आवाहन करण्यात आलं आहे.

## ‘गुंगी गुडिया’ वादावर सुनेत्रा पवारांचा पाच शब्दांत संयमी प्रतिसाद – “मी वेळ आल्यानंतर उत्तर देईन...”

# ‘गुंगी गुडिया’ वक्तव्यावरून राज्यात राजकीय संघर्ष तीव्र!

### काँग्रेसच्या टीकेनंतर महाराष्ट्रातील राजकारण तापले; राष्ट्रवादीचे आंदोलन, मुख्यमंत्री फडणवीसांचा हल्लाबोल

मुंबई | प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात काँग्रेसकडून वापरण्यात आलेल्या ‘गुंगी गुडिया’ या शब्दप्रयोगावरून महाराष्ट्रातील राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. या वक्तव्यामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत असताना, सुनेत्रा पवार यांनी प्रथमच या वादावर प्रतिक्रिया दिली. माध्यमांच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी केवळ पाच शब्दांत, “मी वेळ आल्यानंतर उत्तर देईन...” असे सांगत अधिक भाष्य टाळले. त्यांच्या या संयमी प्रतिक्रियेनंतर राजकीय चर्चांना आणखी वेग आला आहे.

काँग्रेसच्या वक्तव्याचा निषेध करत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. मुंबईतील काँग्रेस कार्यालयाबाहेर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमले. नेते सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत काँग्रेसच्या वक्तव्याचा तीव्र निषेध नोंदविला. महिलांविषयी अपमानास्पद भाषा वापरणे ही काँग्रेसची राजकीय संस्कृती असल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या नेत्यांनी केला.



या वादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेस केवळ चर्चेत राहण्यासाठी खालच्या पातळीचे राजकारण करत असल्याचा आरोप त्यांनी केला. महिलांविषयी अशा प्रकारचे वक्तव्य करणे योग्य नसून सार्वजनिक जीवनातील व्यक्तींवर टीका करताना राजकीय शिष्टाचार पाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दुसरीकडे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पक्षाच्या भूमिकेचे समर्थन केले. त्यांनी सांगितले की, इतिहासात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनाही एकेकाळी ‘गुंगी गुडिया’ अशी उपमा देण्यात आली होती. मात्र त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर ती टीका खोटी ठरवली. सुनेत्रा पवार यांनीही राजकीय वादात न अडकता आपल्या कामगिरीतून स्वतःची ओळख निर्माण करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

दरम्यान, या प्रकरणामुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सोशल मीडियावरही या वक्तव्यावरून समर्थक आणि विरोधकांमध्ये जोरदार चर्चा रंगली आहे. महिला नेतृत्वाचा सन्मान, राजकीय भाषेची मर्यादा आणि सार्वजनिक संवादातील सभ्यता या मुद्द्यांवरही विविध स्तरांतून प्रतिक्रिया उमटत आहेत.

याच पार्श्वभूमीवर माध्यमांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी कोणताही वाद वाढू न देता, “मी वेळ आल्यानंतर उत्तर देईन...” एवढेच सांगून पुढे जाणे पसंत केले. त्यांच्या या मोजक्या पण सूचक प्रतिक्रियेमुळे पुढील काही दिवसांत त्या या विषयावर अधिक सविस्तर भूमिका मांडणार का, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

सध्या तरी ‘गुंगी गुडिया’ या एका शब्दाभोवती सुरू झालेला वाद राज्याच्या राजकारणात मोठा चर्चेचा विषय ठरला असून, येत्या काळात या प्रकरणाचे आणखी राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### राष्ट्रवादी आक्रमक; काँग्रेस कार्यालयात घोषणाबाजी

काँग्रेसने वापरलेला ‘गुंगी गुडिया’ हा शब्द अत्यंत चुकीचा आणि अपमानास्पद असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे. या टीकेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सूरज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी मुंबईतील काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात घुसून जोरदार घोषणाबाजी केली आणि तीव्र विरोध नोंदवला.

## सदनिका गैरव्यवहार प्रकरण : माणिकराव कोकाटेंना सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा नाहीच

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली । (प्रतिनिधी):** सदनिका गैरव्यवहार प्रकरणात माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मंगळवारी दिलासा मिळाला नाही. प्रकरणाची सुनावणी प्रलंबित असल्याने आपल्याला कोणतेही महत्त्वाचे सार्वजनिक पद स्वीकारण्याची परवानगी द्यावी, अशी कोकाटे यांच्या वतीने करण्यात आलेली मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मात्र, यापूर्वी दिलेली शिक्षेवरील स्थगिती कायम ठेवत संबंधित प्रकरणाची सुनावणी शक्यतो सहा महिन्यांच्या आत पूर्ण करण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला दिली.सुनावणीदरम्यान कोकाटे यांच्या वतीने सदनिका गैरव्यवहार प्रकरण अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने न्यायालयीन प्रक्रियेला विलंब होत आहे. त्यामुळे अंतिम निकाल होईपर्यंत कोणतेही महत्त्वाचे पद स्वीकारण्यास परवानगी देण्यात यावी, अशी विनंती करण्यात आली. या मागणीला विरोधी पक्षाच्या वतीने आक्षेप घेण्यात आला.यासंदर्भात विरोधी पक्षाचे वकील ॲड. आशुतोष राठोड यांनी सांगितले की, तीन



न्यायाधीशांच्या खंडपीठाने कोकाटे यांची मागणी मान्य केली नाही. उलट, प्रकरण लवकर निकाली निघावे यासाठी उच्च न्यायालयाने शक्यतो सहा महिन्यांच्या आत सुनावणी पूर्ण करावी, अशा सूचना दिल्या आहेत. अपरिहार्य परिस्थिती निर्माण झाल्यास मर्यादित मुदतवाढ दिली जाऊ शकते, असेही ॲड. राठोड म्हणाले.सदनिका गैरव्यवहार प्रकरणात कोकाटे यांना यापूर्वी दोषी ठरविण्यात आले असून, त्या शिक्षेविरोधात त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. शिक्षेवरील स्थगिती कायम असली तरी महत्त्वाचे सार्वजनिक पद स्वीकारण्यास सर्वोच्च न्यायालयाने परवानगी नाकारल्याने कोकाटे यांना सध्या कोणताही अतिरिक्त दिलासा मिळालेला नाही. आता उच्च न्यायालयातील सुनावणी आणि अंतिम निकालाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.सदनिका गैरव्यवहार प्रकरणात माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मंगळवारी दिलासा मिळाला नाही. प्रकरणाची सुनावणी प्रलंबित असल्याने आपल्याला कोणतेही महत्त्वाचे सार्वजनिक पद स्वीकारण्याची परवानगी द्यावी, अशी कोकाटे यांच्या वतीने करण्यात आलेली मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मात्र, यापूर्वी दिलेली शिक्षेवरील स्थगिती कायम ठेवत संबंधित प्रकरणाची सुनावणी शक्यतो सहा महिन्यांच्या आत पूर्ण करण्याच्या सूचना सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला दिली.सुनावणीदरम्यान कोकाटे यांच्या वतीने सदनिका गैरव्यवहार प्रकरण अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने प्रक्रियेला विलंब होत आहे. त्यामुळे अंतिम निकाल होईपर्यंत कोणतेही महत्त्वाचे पद स्वीकारण्यास परवानगी देण्यात यावी.

## दक्षिणात्य अभिनेता प्रदीपरावतयांचंनिधन!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** भारतीय चित्रपटसृष्टीतून एक दुख:द बातमी समोर येत आहे. प्रसिद्ध अभिनेते आणि ‘गजनी’ चित्रपटातील मुख्य खलनायक प्रदीप रावत यांचे निधन झाले आहे. वयाच्या 74 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ते कर्करोगासारख्या गंभीर आजाराशी झुंज देत होते. उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. प्रदीप रावत यांनी मुंबईतील कोकिळाबेन रुग्णालयात उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला.मिळालेल्या माहितीनुसार त्यांची कर्करोगाशी सुरू झुंज सुरू होती. रक्ताचा कर्करोग झाल्यानंतर त्यांच्यावर उपचार सुरू होते.उपचारादरम्यान त्यांची प्रकृती चिंताजनक झाली आणि रुग्णालयातच त्यांची प्राणज्योत मालवली.‘लगान’ चित्रपटातील त्यांचे सहकलाकार यशपाल शर्मा यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत त्यांच्या निधनाची दुःखद माहिती दिली. ‘महाभारत’ मधील ‘अश्वत्थामा’ ते ‘गजनी’ मधील व्हिलेन अशा विविध भूमिकांमधून त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते. मिळालेल्या माहितीनुसार,प्रदिप रावत यांनी कर्करोग झाला होता आणि तो पुन्हा बळावला होता. काही तासांपूर्वीच त्यांचे निधन झाले.ते 74 वर्षांचे होते आणि त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी व



मुलगा विक्रमादित्य असा परिवार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ते गेल्या एका महिन्याहून अधिक काळापासून रुग्णालयात दाखल होते.'गजनी' चित्रपटातील खलनायक प्रदीप सिंह रावत यांचे निधन धाले आहे.ज्येष्ठ अभिनेते प्रदीप सिंह रावत यांचे वयाच्या 74 व्या वर्षी निधन. मुंबईतील कोकिलाबेन रुग्णालयात आज सायंकाळी अखेरचा श्वास घेतला आहे. रक्ताच्या कर्करोगावर (ब्लड कन्सर) उपचार सुरू असताना निधन झालं आहे. गजनी' चित्रपटातील दमदार खलनायकाच्या भूमिकेमुळे विशेष ओळख झाली होती. लगान' आणि 'सरफरोश'मधील अभिनयालाही प्रेक्षकांची मोठी पसंती मिळाली आहे, 'महाभारत' मालिकेतील अश्वत्थामा ही भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात.हिंदी, तेलुगू आणि तमिळ चित्रपटसृष्टीतील प्रदीर्घ कारकीर्द आहे. प्रदीप सिंह रावत यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीवर शोककळा. परसरली आहे. दरम्यान, प्रदीप रावत यांनी आपल्या करिअरची सुरुवात बी. आर. चोप्रा यांच्या ‘महाभारत’ मालिकेतून केली होती.

## रुग्णांच्याआहाराचीजबाबदारी आता महिला बचतगटांवर!

### १०० गुणांच्या निकषांवर होणार मूल्यमापन



जन सम्राट टाईम्स

**मुंबई । (प्रतिनिधी) :** जिल्हा, उपजिल्हा आणि ग्रामीण भागांतील सरकारी रुग्णालयांत रुग्णांना आहार देण्याची जबाबदारी आता महिला बचतगटांवर सोपविण्यात आली आहे. २०० पेक्षा कमी खाटा असलेल्या रुग्णालयांतील आहार सेवा महिला बचत गटांमार्फत चालविण्यास सरकारने मान्यता दिली आहे. राज्याच्या महिला धोरणांअंतर्गत महिलांना रोजगार व उद्योजकतेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच रुग्णांना दर्जेदार, पौष्टिक आणि वेळेवर आहार मिळावा यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. विविध सरकारी रुग्णालयांत आहार सेवा खासगी संस्थांकडून पुरविली जाते. मात्र सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार आता हे काम संबंधित तालुक्यातील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (एमएसआरएलएम) नोंदणीकृत व पात्र महिला बचत गटांकडे हे काम सोपविले जाणार आहे.

यामुळे ग्रामीण भागातील उद्योजकतेला चालना मिळण्याचे अपेक्षा सरकारकडून व्यक्त करण्यात आली आहे.महिला बचतग गटांची निवड ही गुणवत्तेवर आधारित होणार असून यामध्ये बचत गटाची कामगिरी, आहार सेवा व उद्योजकतेचा अनुभव, मनुष्यबळ, आर्थिक क्षमता आणि सामाजिक विश्वासार्हता या पाच निकषांच्या आधारे गुणांकन ठरणार आहे. १०० पैकी ८० किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवणारे गट यासाठी पात्र ठरणार आहेत, तर ७० ते ७९ गुण मिळवणाऱ्या बचतग गटांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक रुग्णालयासाठी १० बचत गटांचे पॅनेल तयार करण्यात येणार आहे. यातील सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या गटाला एक वर्षासाठी कार्यादेश देण्यात येतील. समाधानकारक काम केल्यास मुदतवाढ दिली जाणार असून काम असमाधानकारक असल्यास पुढील गटाला संधी मिळेल.


आहार सेवेचा अंदाजित दर सरकारने निश्चित केला असून प्रति रुग्ण प्रतिदिन मूलभूत आहारासाठी १४५ रुपये, इंधन, मनुष्यबळ व अन्य खर्चासाठी २९ रुपये आणि महिला बचत गटांसाठी किमान १० टक्के नफा ग्राह्य धरून १९१.४० रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. अन्न-सुरक्षा व स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास ५०० रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाणार आहे

## अहिल्यानगरच्या शेवगावमध्ये बिबट्याची दहशत

### नर-मादीसह पिल्लांचा वावर, शेतात जायचं कसं? ग्रामस्थ काळजीत

जन सम्राट टाईम्स

**अहिल्यानगर | प्रतिनिधी** बिबट्याच्या (Leopard) हल्ल्यात जीव गमावल्याच्या किंवा चिमुकल्यांवरही बिबट्याने हल्ला केल्याच्या घटना पुणे जिल्ह्यात घडल्या आहेत. त्यानंतर, ग्रामस्थांनी सातत्याने या मुद्द्यावरुन प्रशासन आणि सरकारपुढे आपली व्यथा मांडल्याचं दिसून आलं. मात्र, अद्यापही काही गावांत बिबट्याची दहशत पाहायला मिळत असून शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीती जाणवते. अहिल्यानगर (Ahilyanagar) जिल्ह्यातील



शेवगाव तालुक्यात बिबट्याचा वावर दिवसेंदिवस वाढत चालला असून, तालुक्यातील अमरापूर, शहाजापूर आणि आव्हाने या परिसतात बिबट्याचा वावर पुन्हा वाढल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत. विशेष म्हणजे, या भागात बिबट्याचा नर-मादीसह पिल्लांचा वावर असल्यामुळे स्थानिक शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शेतकरी आणि ग्रामस्थांसमोर बिबट्याचे मोठे संकट असून सध्या खरीप हंगामातील पिकांची देखभाल करण्यासाठी शेतकऱ्यांना दिवसा आणि रात्रीच्या वेळी शेतात जावे लागते. मात्र, परिसरात बिबट्याचा आणि त्याच्या पिल्लांचा वावर असल्यामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. जनावरांच्या सुरक्षेचा आणि स्वतःच्या जीवाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे मुश्कील झाले असून, शेतीची कामे रखडण्याची भीती निर्माण झाली आहे.परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमधून संताप आणि भीती व्यक्त होत आहे. अनुचित घटना घडण्यापूर्वी वनविभागाने तातडीने दखल घेऊन या भागात पिंजरा लावावा आणि या बिबट्यांना जेरबंद करावे, अशी मागणी संतप्त शेतकरी आणि ग्रामस्थांकडून वनविभाग प्रशासनाकडे केली जात आहे. बिबट्याचा वावर वाढल्याने आमच्या जीवाला सतत धोका निर्माण झाला आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## तुकाराम मुंढे यांचा मोठा दणका ; ॲनालॉग पनीरवर वर्षभरासाठी बंदी

### अनलॉग किंवा दुग्धेतर पनीरच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर राज्य सरकारने एक वर्षासाठी बंदी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्यात पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या अनलॉग किंवा दुग्धेतर पनीरच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर राज्य सरकारने एक वर्षासाठी बंदी घातली आहे.



अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गुरुवारी यासंदर्भातील आदेश जारी केला. राज्यभरातील तपासणीत पनीरचे ३५.४ टक्के नमुने विहित मानकांशी विसंगत आढळल्याने आणि अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांशाचा वापर झाल्याचे स्पष्ट झाल्याने सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

भाजपचे श्रीगोंदाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करून याबाबत पाठपुरावा केला होता. पाचपुते यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांना पत्र लिहून राज्यात पनीरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या ॲनालॉग किंवा दुग्धेतर पनीरवर बंदी घालण्याची मागणी केली होती. ग्राहकांची दिशाभूल होत असून अशा उत्पादनांमुळे आरोग्यालाही धोका निर्माण होत असल्याचा मुद्दा त्यांनी पत्रात उपस्थित केला होता. या बंदीचचे स्वागत करत, अध्यादेशाची पूर्ण ताकदीने अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा पाचपुते यांनी लोकसत्ताशी बोलताना व्यक्त केली.

#### १०९ नमुने निकृष्ट

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यभरातून गोळा करण्यात आलेल्या ३०८ नमुन्यांच्या तपासणीत १०९ नमुने निकृष्ट किंवा असुरक्षित असल्याचे आढळले. त्यापैकी ७९ नमुने निकृष्ट दर्जाचे तर ३० नमुने थेट असुरक्षित असल्याचा प्रयोगशाळेचा अहवाल आहे. तपासणीत अनेक नमुन्यांमध्ये दुधातील स्निग्धांशाऐवजी वनस्पतीजन्य स्निग्धांश वापरण्यात आल्याचेही निष्पन्न झाले.

#### ॲनालॉग पनीर कोणाला म्हणायचे?

दुधातील फॅट्स किंवा घटक काढून, त्याऐवजी वनस्पतीजन्य तेल, डालडा किंवा इतर दुधाव्यतिरिक्तच्या वस्तू वापरून बनवलेल्या पदार्थाला (ॲनालॉग) किंवा ‘दुग्धेतर पनीर’ म्हटले जाईल.

#### बंदी आदेश काय म्हणतो ?

– उत्पादनापासून ते किरकोळ विक्रीपर्यंतच्या सर्व व्यवहारांवर राजपत्रात आदेश प्रसिद्ध झाल्यापासून एक वर्षासाठी बंदी
– हॉटेल, रेस्टॉरंट, केटरर्स, क्लाऊड किचन आणि इतर खाद्यसेवा आस्थापनांनाही अशा दुग्धेतर पनीरचा कोणत्याही खाद्यपदार्थात वापर करता येणार नाही.
– ग्राहकांना ते अस्सल पनीर म्हणून देणे किंवा त्याबाबत माहिती लपविणे ही अनुचित व्यापार पद्धत मानून कारवाई केली जाईल.
– पनीर किंवा छेना विकणाऱ्या सर्व अन्न व्यवसायिकांना पॅकेजिंग व लेबलिंगबाबत अन्न सुरक्षा नियमांचे पालन करणे बंधनकारक.
– आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत दंडात्मक कारवाई

# विद्यार्थ्यांच्या हक्काचा पोषण आहार खुल्या बाजारात विकल्याचा संशय; धामणगावातील शाळेवर गंभीर आरोप

## १०० टक्के हजेरी दाखवून पोषण आहारातील साहित्य गायब केल्याचा दावा;

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी**

जळगाव तालुक्यातील धामणगाव येथील कै. बाबडू सुपडू सपकाळे विद्यालयावर विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहाराबाबत गंभीर आरोप करण्यात आले आहेत. शासनाकडून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणारा पोषण आहाराचा तांदूळ व इतर साहित्य शाळेत वापरण्याऐवजी जळगाव शहरातील पिंप्राळा परिसरातील काही दुकानांमध्ये विक्रीसाठी नेला जात असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. या आरोपांमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, या विद्यालयात धामणगावसह आसपासच्या गावांतील गरीब, शेतकरी आणि मजूर कुटुंबातील विद्यार्थी शिक्षण घेतात. शासनाच्या पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना नियमित पौष्टिक आहार देणे बंधनकारक असतानाही प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रमाणात आहार मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### १०० टक्के हजेरी, पण पोषण आहारात तफावत?

पालकांच्या म्हणण्यानुसार, शाळेच्या नोंदींमध्ये विद्यार्थ्यांची १०० टक्के उपस्थिती दाखवली जाते. त्यामुळे शासनाकडून पूर्ण क्षमतेने पोषण आहाराचे साहित्य प्राप्त होते. मात्र, प्रत्यक्षात त्या साहित्याचा काही भाग विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नसून तो गायब केला जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे शासकीय योजनांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### चौकशीची मागणी

या प्रकरणाची जिल्हा परिषद शिक्षण विभाग, पोषण आहार विभाग आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने दखल घेऊन शाळेतील पोषण आहार साठा, वितरण नोंदी, उपस्थिती रजिस्टर आणि पुरवठा अभिलेखांची सखोल तपासणी करावी, अशी मागणी होत आहे. तसेच पिंप्राळा परिसरातील संबंधित दुकानांचीही चौकशीकरून सत्य परिस्थिती समोर आणावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पिंप्राळा भागात विक्रीचा आरोप

पालकांनी केलेल्या आरोपानुसार, शाळेतून गायब झालेला तांदूळ व इतर पोषण आहार साहित्य जळगाव शहरातील पिंप्राळा परिसरातील काही किराणा दुकानांमध्ये विक्रीसाठी नेला जात आहे. या आरोपांना अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नसला तरी संबंधित यंत्रणांनी या दाव्याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

### पालकांचा संताप; कठोर कारवाईची मागणी

या प्रकारामुळे पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या पोषणासाठी शासनाकडून दिला जाणारा आहार जर गैरमार्गाने विकला जात असेल, तर हा विद्यार्थ्यांच्या हक्कावर घाला असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली. संबंधित प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

# यावल पोलिसांची मोहराळे गावात धडक कारवाई




जन सम्राट टाईम्स

**यावल ।** प्रतिनिधी : यावल पोलिसांनी मोहराळे गावात अवैध दारू विक्री आणि निर्मितीविरोधात धडक कारवाई करत तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत पोलिसांनी हातभट्टी दारूसह देशी दारूचा मोठा साठा जप्त केला असून, अवैध दारू व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. मोहराळे गावात अवैध दारू निर्मिती व विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती यावल पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिस पथकाने तातडीने कारवाई करत गावातील तीन ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत शकील तडवी याच्याकडून १५ लिटर गावरान हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली. तसेच शालिग्राम अळकमोल याच्याकडून ९० मिली क्षमतेच्या सुमारे २१ दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या. तर तिसऱ्या कारवाईत समाधान अडकमोल याच्याकडूनही ९० मिली क्षमतेच्या सुमारे २१ दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. यावल पोलिसांच्या या कारवाईमुळे मोहराळे परिसरातील अवैध दारू विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. नागरिकांच्या आरोग्याला आणि कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या अवैध धंद्यांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

# आरक्षण उपवर्गीकरण विरोधी अभियानाला रावेर तालुक्यात वेग

## मोर्चासाठी गावोगावी जनजागृती




जन सम्राट टाईम्स

**रावेर । प्रतिनिधी :** आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी 'आरक्षण उपवर्गीकरण विरोधी सामाजिक कृती समिती, रावेर तालुका' यांच्या वतीने तालुकाभर व्यापक प्रचार अभियान राबविण्यात येत आहे. आगामी १० ऑगस्ट २०२६ रोजी रावेर येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोर्चाच्या पार्श्वभूमीवर समितीचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवक गावोगावी जाऊन नागरिकांशी संवाद साधत असून अभियानाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. मोर्चाच्या तयारीचा भाग म्हणून तालुक्यातील विविध गावांमध्ये बैठका, चर्चासत्रे आणि प्रत्यक्ष भेटीगाठी आयोजित करण्यात येत आहेत.

या माध्यमातून आरक्षण उपवर्गीकरणाचे संभाव्य परिणाम, संविधानिक आरक्षणाचे महत्त्व आणि सामाजिक हक्कांविषयी नागरिकांमध्ये जागृती करण्यात येत आहे. समाजातील विविध घटक या अभियानात सक्रियपणे सहभागी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी संविधानिक आरक्षणाचे संरक्षण आणि सामाजिक एकजूट अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक समाजबांधवाने १० ऑगस्ट रोजी रावेर येथे होणाऱ्या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. दरम्यान, या जनजागृती अभियानात निःस्वार्थपणे सहभागी होऊन गावोगावी प्रचार-प्रसार करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, महिला व युवा पदाधिकाऱ्यांचे कृती समितीच्या वतीने अभिनंदन व आभार व्यक्त करण्यात आले. आरक्षण उपवर्गीकरणाच्या विरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी 'आरक्षण उपवर्गीकरण विरोधी सामाजिक कृती समिती, रावेर तालुका' यांच्या वतीने तालुकाभर व्यापक प्रचार अभियान राबविण्यात येत आहे. आगामी १० ऑगस्ट २०२६ रोजी रावेर येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोर्चाच्या पार्श्वभूमीवर समितीचे पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवक गावोगावी जाऊन नागरिकांशी संवाद साधत असून अभियानाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. मोर्चाच्या तयारीचा भाग म्हणून तालुक्यातील विविध गावांमध्ये बैठका, चर्चासत्रे आणि प्रत्यक्ष भेटीगाठी आयोजित करण्यात येत आहेत.

# नशिराबादच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप

## नर्सरीपासून गरजू विद्यार्थ्यांपर्यंत मदतीचा हात

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी:** नशिराबाद येथील न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिर येथे नर्सरी तसेच गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सामाजिक बांधिलकी जपत दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक जनार्दन माळी होते. यावेळी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सुनिता बनसोडे, उपशिक्षक जे. वाय. महाजन, माजी विद्यार्थी रोहित चौधरी तसेच मुख्याध्यापक प्रविण महाजन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि मान्यवरांच्या स्वागताने झाली. त्यानंतर गणेश वामन पाटील यांच्या वतीने नर्सरीच्या विद्यार्थ्यांना गणवेश, तर संजय चौधरी यांच्या सहकार्याने शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. यानंतर शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी रोहित चौधरी यांच्या हस्ते गणवेश व



शालेय साहित्य देण्यात आले. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात आत्मविश्वासाने करण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि पालकांच्या समाधानाने कार्यक्रमाला विशेष भावनिक स्वरूप प्राप्त झाले. अध्यक्षीय भाषणात जनार्दन माळी यांनी शिक्षणासोबत सामाजिक उत्तरदायित्वाचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेच्या प्रगतीसाठी आणि गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी सातत्याने सहकार्य करणाऱ्या सर्व दात्यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची प्रेरणा वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. नशिराबाद येथील न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिर येथे नर्सरी तसेच गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सामाजिक बांधिलकी जपत दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन जयश्री चौधरी आणि स्वाती चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक प्रविण महाजन यांनी केले. या प्रसंगी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक सहकार्य आणि शैक्षणिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम उपस्थितांच्या कौतुकाचा विषय ठरला.

# महाराष्ट्र राज्य शिक्षक-शिक्षकेतर सेनेच्या जळगाव जिल्हा महिला अध्यक्षपदी सौ. खडके

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य शिक्षक-शिक्षकेतर सेनेच्या जळगाव जिल्हा कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यात आली असून, सौ. सुनीता मिलिंद खडके यांची जिल्हा महिला अध्यक्षा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रांताध्यक्ष तथा शिक्षक आमदार किशोरभाऊ दराडे यांच्या नेतृत्वाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. याचवेळी जिल्ह्यातील १६ तालुक्यांसाठी नव्या तालुकाध्यक्षांचीही घोषणा करण्यात आली. ही कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण, जिल्हा सरचिटणीस महेंद्र पवार आणि विभागीय अध्यक्ष संभाजी आप्पा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गठित करण्यात आली. नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे संघटनेचे संघटनात्मक बळ वाढणार असून, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे शैक्षणिक, प्रशासकीय, वेतन, सेवा विषयक आणि इतर प्रलंबित प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडता येतील, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे. यावेळी प्रांताध्यक्ष तथा शिक्षक आमदार किशोरभाऊ दराडे तसेच माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर संघटना समन्वय समितीचे जिल्हा समन्वयक तुळशीराम सोनवणे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. संघटनेचा विस्तार करताना शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी निष्ठेने आणि एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. नवनियुक्त तालुकाध्यक्ष पुढीलप्रमाणे : पाचोरा – चंद्रकांत बाजीराव पाटील धरणगाव – सुधाकर रामचंद्र पाटील एरंडोल – राजेंद्र त्र्यंबक पाटील पारोळा – रामकृष्ण मनसुख पाटील जामनेर – गजानन एकनाथ पाटील भडगाव – रोहन राजेंद्र परदेशी जळगाव शहर – मयूर रावसाहेब पाटील जळगाव ग्रामीण – सचिन दिलीप चव्हाण भुसावळ – शरद चुडामन पाटील रावेर – पंकज राजू पाटील यावल – अमजद खान जबर खान मुक्ताईनगर – दिलीप श्रीराम पाटील चाळीसगाव – जहिरुद्दीन सिराजुद्दीन शेख चोपडा – जगदीश आत्माराम पाठक अमळनेर – राजेंद्र श्रीराम पाटील बोदवड – मयूर अशोक सत्रे जळगाव जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने सर्व नवनियुक्त तालुकाध्यक्ष आणि जिल्हा महिला अध्यक्षा सौ. सुनीता मिलिंद खडके यांचे अभिनंदन करण्यात आले. संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रत्येक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. या प्रसंगी जिल्ह्यातील शिक्षक-शिक्षकेतर सेनेचे पदाधिकारी, सभासद तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रलंबित जात प्रमाणपत्रे तातडीने द्या; सकल आदिवासी कोळी समाजाचे भुसावळ प्रांत कार्यालयावर निवेदन

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी:** जात प्रमाणपत्रासाठी अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, या मागणीसाठी सकल आदिवासी कोळी समाजाच्या वतीने मंगळवारी (४ ऑगस्ट) भुसावळ प्रांत कार्यालयात तहसीलदार विनते यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले. यावेळी दोन महिन्यांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या आणि आवश्यक कागदपत्रे पूर्ण असलेल्या अर्जांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शिष्टमंडळाने ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनापूर्वी प्रांत कार्यालयाकडे प्रलंबित असलेली सर्व पात्र जात प्रमाणपत्रांची प्रकरणे निकाली काढावीत, अशी मागणी केली. यावर तहसीलदार विनते यांनी आवश्यक कागदपत्रे पूर्ण असलेल्या सर्व प्रकरणांचा निपटारा ९ ऑगस्टपर्यंत करण्यासाठी प्रयत्न



करण्यात येतील, असे आश्वासन दिले. यावेळी तहसीलदारांनी ३ ऑगस्ट रोजी सुमारे २५ ते ३० जात प्रमाणपत्रे वितरित करण्यात आल्याची माहितीही दिली. उर्वरित पात्र अर्जांवरही वेगाने कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. सकल आदिवासी कोळी समाजाच्या प्रतिनिधींनी जात प्रमाणपत्रासाठी सुरू असलेला संघर्ष पुढेही कायम राहणार असून, पात्र लाभार्थ्यांना वेळेत प्रमाणपत्र मिळावे यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी भूमिका मांडली. या प्रसंगी स्वराज्य कोळी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सकल आदिवासी कोळी समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अनुसूचित जाती व नवबौद्ध नवउद्योजकांसाठी सुवर्णसंधी; 'स्टँड अप इंडिया' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

## फक्त १० टक्के स्व-हिस्सा भरून उद्योग सुरू करण्याची संधी

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी**

अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील नवउद्योजकांना उद्योग व्यवसायासाठी आर्थिक बळ मिळावे आणि स्वावलंबनाचा मार्ग खुला व्हावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत केंद्र शासनाची 'स्टँड अप इंडिया' योजना अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील पात्र इच्छुक नवउद्योजकांकडून अर्ज मागविण्यात आले असून ३१ ऑगस्ट २०२६ ही अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत असल्याचे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त योगेश पाटील यांनी शासकीय प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या २७ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार केंद्र शासनाने स्टँड अप इंडिया योजनेच्या निकषांमध्ये सुधारणा करून लाभार्थ्यांसाठी अधिक सुलभ मार्गदर्शक तत्त्वे लागू केली आहेत. त्यामुळे अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील उद्योजकांना उद्योग उभारणीसाठी मोठा आर्थिक आधार उपलब्ध होणार आहे. सुधारित योजनेनुसार लाभार्थ्याला उद्योग सुरू करण्यासाठी केवळ १० टक्के स्व-हिस्सा भरावा लागणार आहे. त्यानंतर राष्ट्रीयकृत बँकेमार्फत प्रकल्पासाठी ७५ टक्के कर्ज मंजूर करण्यात येईल, तर उर्वरित १५ टक्के रक्कम राज्य शासनाकडून अनुदान (सबसिडी) स्वरूपात देण्यात येणार आहे.



त्यामुळे नवउद्योजकांवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होणार असून उद्योग उभारणीचा मार्ग अधिक सुलभ होईल. या योजनेचा लाभ १८ वर्षांवरील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील पात्र नवउद्योजकांना मिळणार आहे. उत्पादन, सेवा, व्यवसाय तसेच विविध लघुउद्योग क्षेत्रांमध्ये नवीन उद्योग सुरू करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार असून, रोजगारनिर्मितीबरोबरच आर्थिक सक्षमीकरणालाही चालना मिळणार आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे समाजातील तरुणांनी नोकरीच्या शोधात न राहता उद्योग-व्यवसायाकडे वळावे, स्वावलंबी व्हावे आणि रोजगारनिर्माते बनावे, हा योजनेचा मुख्य उद्देश आहे. शासनाने आर्थिक सहाय्यासोबतच उद्योजकतेला प्रोत्साहन देणारी ही योजना अधिक परिणामकारक करण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू केले आहेत. जिल्ह्यातील पात्र इच्छुकांनी विहित मुदतीत अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे. अधिक माहितीसाठी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, मायादेवी मंदिराजवळ, महाबळ रोड, जळगाव येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# पीएमएफएमई योजनेच्या अनुदानातून कमिशन उकळल्याचा आरोप

## प्रत्येकी २० हजार रुपये सक्तीने घेतल्याचा दावा; तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यात केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन (PMFME) योजनेअंतर्गत मिळणाऱ्या अनुदानाच्या रकमेतून महिलांकडून कथितरीत्या कमिशन उकळण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. धुळे तालुक्यातील अजनाळे येथील सुमारे ५० ते ६० महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत संबंधितांवर आर्थिक फसवणुकीचा आरोप केला असून, दोषींवर तातडीने गुन्हा दाखल



करण्याची मागणी केली आहे. महिलांच्या म्हणण्यानुसार, शेतकरी, कष्टकरी आणि विधवा महिलांना व्यवसाय उभारणीसाठी शासनाकडून ७० हजार रुपयांचे अनुदान बँक खात्यात जमा करण्यात येते. मात्र, या अनुदानातून प्रत्येकी २० हजार रुपये सक्तीने रोख स्वरूपात काढून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारदार महिलांनी मनीष भोसले, अनुसया भोसले आणि विनोद पवार यांच्यावर गंभीर आरोप करत, त्यांनी महिलांची दिशाभूल करून तसेच दबाव टाकून ही रक्कम घेतल्याचा दावा केला आहे. ही रक्कम एका खाजगी कंपनीच्या नावाखाली कमिशन म्हणून वसूल करण्यात आल्याचेही महिलांनी निवेदनात नमूद केले आहे. महिलांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार केवळ अजनाळे गावापुरता मर्यादित नसून परिसरातील २७ ते २८ गावांमध्ये अशाच पद्धतीने अनेक लाभार्थ्यांकडून पैसे घेतल्याचा संशय आहे. त्यामुळे या कथित गैरव्यवहाराची व्याप्ती मोठी असू शकते, असा आरोप महिलांनी केला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करताना संतप्त महिलांनी संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, तसेच लाभार्थी महिलांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी केली.


प्रशासनाकडून वेळेत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची अधिकृत चौकशी होणे बाकी असून संबंधित व्यक्तींची भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या आरोपांबाबत प्रशासनाच्या चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेला वेग; ₹7,000 कोटींच्या निधी वितरणाची प्रक्रिया सुरु असल्याचा दावा!

## पात्र शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने निधी वर्ग केला जात असल्याची माहिती

जन सम्राट टाईम्स



मुंबई | विशेष प्रतिनिधी
राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक मानल्या जाणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' अंतर्गत निधी वितरणाच्या प्रक्रियेला वेग आल्याची माहिती समोर आली आहे. उपलब्ध माहितीनुसार, पहिल्या टप्प्यात सुमारे ₹७,००० कोटींचा निधी पात्र लाभार्थ्यांच्या खात्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

राज्यातील अनेक भागांमध्ये अतिवृष्टी, दुष्काळ, अवकाळी पाऊस आणि इतर नैसर्गिक संकटांमुळे शेतकऱ्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत कर्जमाफीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे.

डीबीटीद्वारे निधी थेट खात्यात

माहितीनुसार, या योजनेअंतर्गत सुमारे १६ लाख ९४ हजार पात्र शेतकऱ्यांच्या पीककर्ज खात्यांमध्ये कर्जमाफीची रक्कम डीबीटी प्रणालीद्वारे जमा केली जात आहे. ज्या लाभार्थ्यांनी आधार संलग्न ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांना पहिल्या टप्प्यात प्राधान्याने निधी वर्ग केला जात आहे. उर्वरित लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण केल्यानंतर त्यांच्याही खात्यात निधी जमा केला जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

**योजनेतील प्रमुख तरतुदी**

योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना ₹२ लाखांपर्यंतच्या पीककर्जाची मुद्दल व व्याजासह कर्जमाफी देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर चालू खरीप हंगामासाठी पात्र शेतकऱ्यांना नवीन पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँकांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आहे.

**प्रमुख मुद्दे आणि वैशिष्ट्येनिधिमंजूरी:**
२०२६-२७ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीद्वारे मंजूर २०,५५२ कोटींपैकी पहिल्या टप्प्यात ७,००० कोटी रुपये वितरित होत आहेत.पात्रता व मर्यादा:

०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेले आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेले कमाल ₹२ लाखांपर्यंतचे अल्पमुदत पीककर्ज माफ केले जात आहे.ई-केवायसी अनिवार्य:

लाभ मिळण्यासाठी आधार प्रमाणीकरण (ई-केवायसी) पूर्ण असणे आवश्यक असून ई-केवायसी पूर्ण झालेल्या खात्यांमध्ये पैसे जमा होत आहेत.अपात्रता: सहकार विभागाच्या डेटा पडताळणीनुसार आयकर (Income Tax) भरणारे सुमारे ९४,००० शेतकरी या योजनेतून वगळण्यात आले आहेत.ओटीएस आणि प्रोत्साहन:

२ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्यांसाठी एकवेळ समझोता (OTS) योजना आणि नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ₹५०,००० पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ समाविष्ट आहे.

याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर अनुदान, तसेच ₹२ लाखांपेक्षा जास्त कर्ज असलेल्या लाभार्थ्यांसाठी वन टाइम सेटलमेंट (OTS) पर्याय उपलब्ध करून देण्याचाही प्रस्ताव योजनेत समाविष्ट असल्याचे सांगितले जात आहे.

# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत कुमारी गार्गी विनोद बाऱ्हे शाळेत प्रथम

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ | प्रतिनिधी:** पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूल, सावदा येथील इयत्ता चौथीची विद्यार्थिनी कुमारी गार्गी विनोद बाऱ्हे हिने ३०० पैकी २३४ गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळेसह संपूर्ण सावदा व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गार्गी ही प्रकाश विद्यालय, वाघोदा येथील शिक्षक विनोद बाऱ्हे आणि उमेश्वर विद्यालय, दसनूर येथील शिक्षिका सोनल बाऱ्हे यांची कन्या आहे. लहान वयातच अभ्यासातील सातत्य, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर तिने हे घवघवीत यश संपादन केले आहे. आपल्या यशाबद्दल भावना व्यक्त करताना गार्गीने या यशाचे श्रेय आई-वडील, गुरुजन, काका-काकू आणि कुटुंबीयांच्या सततच्या मार्गदर्शनाला दिले. तिच्या यशामागे शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन महत्त्वाचे ठरल्याचे तिने नमूद केले. गार्गीच्या या यशाबद्दल डॉ. उल्हास पाटील इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी, वर्गमित्र यांनी तिचे अभिनंदन करून भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेनेही तिच्या यशाचा गौरव करत इतर विद्यार्थ्यांसाठी ती प्रेरणादायी ठरल्याचे सांगितले. तिच्या या यशामुळे सुगंगा नगर, सावदा तसेच उदळी परिसरात आनंदाचे वातावरण असून, नातेवाईक, मित्रपरिवार, शिक्षक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही शिक्षण क्षेत्रात अशीच उज्ज्वल कामगिरी करून शाळेचे व पालकांचे नाव उंचावेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# तहसीलदार हल्ला प्रकरणी मुख्य सूत्रधारांना अटक करा

## कर्मचारी महासंघाचे प्रशासनाला निवेदन



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** बोदवडचे तहसीलदार डी. पी. सपकाळे यांच्यावर कथित वाळू माफियांनी केलेल्या हल्ला प्रकरणातील मुख्य सूत्रधारांसह अद्याप फरार असलेल्या सर्व आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या वतीने पोलीस प्रशासनाला निवेदन देण्यात आले. पोलीस अधीक्षकांच्या अनुपस्थितीत हे निवेदन अप्पर पोलीस अधीक्षक संदीप गावित यांना सादर करण्यात आले. निवेदनात हल्ला प्रकरणातील केवळ एका आरोपीवर कारवाई करून चालणार नाही, तर संपूर्ण कट रचणाऱ्या मुख्य सूत्रधारांसह सर्व संबंधित आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. निवेदनाची गंभीर दखल घेत अप्पर पोलीस अधीक्षक संदीप गावित यांनी निवेदनाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी उपस्थित प्रतिनिधींसमोरच संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच बोदवड पोलीस निरीक्षक यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून प्रकरणाचा आढावा घेतला. तसेच तपासाला गती देत आवश्यक ती कठोर कारवाई करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. हल्ला प्रकरणातील उर्वरित आरोपींविरुद्धही नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी शिष्टमंडळाला दिले. यावेळी कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे नाशिक विभागीय अध्यक्ष रवींद्र तायडे, जिल्हा कार्याध्यक्ष योगेश अडकमोल, सहसचिव रवींद्र गायकवाड, मनपा कार्याध्यक्ष नंदू गायकवाड, किशोर महिराळे, महेश सपकाळे, दिलीप मोरे यांच्यासह विविध विभागांतील पदाधिकारी उपस्थित होते. पोलीस अधीक्षकांच्या अनुपस्थितीत हे निवेदन अप्पर पोलीस अधीक्षक संदीप गावित यांना सादर करण्यात आले. निवेदनात हल्ला प्रकरणातील केवळ एका आरोपीवर कारवाई करून चालणार नाही, तर संपूर्ण कट रचणाऱ्या मुख्य सूत्रधारांसह सर्व संबंधित आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. हल्ला प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करून दोषींना कठोर शिक्षा मिळावी, तसेच महसूल अधिकाऱ्यांवर हल्ला करणाऱ्यांविरुद्ध प्रशासनाने कडक भूमिका घ्यावी, अशी मागणी यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

# जळगाव पीपल्स बँकेकडून नशिराबाद येथील ६० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## प्रगतीसाठी साहित्याचा योग्य वापर करण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद | प्रतिनिधी:** सामाजिक बांधिलकी जपत जळगाव पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने नशिराबाद येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील ६० विद्यार्थ्यांना वह्या, व्यावसायिक पुस्तिका, कंपास पेटी, चित्रकला वही आदी शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नशिराबाद शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष विनायक वाणी होते.
यावेळी जळगाव पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन अनिकेत पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बँकेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित केली. समाजाच्या प्रति असलेली जबाबदारी लक्षात घेऊन बँकेच्या माध्यमातून अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा उपयोग आपल्या अभ्यासात सातत्य, गुणवत्ता आणि प्रगतीसाठी करावा, असे आवाहनही त्यांनी केले. शिक्षण हेच उज्ज्वल भविष्य घडविण्याचे प्रभावी साधन असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना मनापासून अभ्यास करण्याचा सल्ला त्यांनी दिला. सामाजिक बांधिलकी जपत जळगाव पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने नशिराबाद येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील ६० विद्यार्थ्यांना वह्या, व्यावसायिक पुस्तिका, कंपास पेटी, चित्रकला वही आदी शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नशिराबाद शिक्षण मंडळाचे उपाध्यक्ष विनायक वाणी होते.कार्यक्रमास बँकेचे संचालक प्रवीण खडके, तरल शहा, निमिष पाटील, विजय जोशी, संचालिका ज्योत्स्ना बराटे, तसेच बँकेचे अधिकारी शुभश्री दप्तरी यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी नशिराबाद शिक्षण मंडळाचे संचालक ॲड. प्रदीप देशपांडे, शाळेच्या मुख्याध्यापिका एस. ए. बनसोडे, उपमुख्याध्यापक ए. डी. चौधरी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी. टी. पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक, शिक्षक आणि उपस्थित मान्यवरांनी स्वागत करत जळगाव पीपल्स बँकेच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

# कासोदा ग्रामीण रुग्णालय व ब्राम्हणे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी पाठपुरावा

## ग्रामीण आरोग्य सेवांसाठी आ. अमोल पाटील यांचा पुढाकार

जन सम्राट टाईम्स



**एरंडोल । (प्रतिनिधी):** एरंडोल-पारोळा विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम, आधुनिक आणि दर्जेदार करण्यासाठी आमदार अमोल पाटील यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची मुंबई येथे सदिच्छा भेट घेऊन विविध महत्त्वाच्या आरोग्यविषयक मागण्यांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी कासोदा प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यासह ब्राम्हणे येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याची मागणी करण्यात आली. बैठकीत कासोदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. ही मागणी मंजूर झाल्यास कासोदा व परिसरातील हजारो नागरिकांना अत्याधुनिक आणि तातडीच्या आरोग्य सेवा स्थानिक स्तरावरच उपलब्ध होतील. त्यामुळे गंभीर रुग्णांना उपचारासाठी दूरच्या शहरांकडे धाव घ्यावी लागणार नाही आणि ग्रामीण नागरिकांचा वेळ व खर्च दोन्हीची बचत होणार आहे. याशिवाय ब्राम्हणे येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. हे केंद्र सुरू झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना प्राथमिक उपचार, माता-बाल आरोग्य सेवा, लसीकरण, नियमित आरोग्य तपासणी तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे मिळणार असल्याचे सांगण्यात आले. कासोदा प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यासह ब्राम्हणे येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याची मागणी करण्यात आली. बैठकीत कासोदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालयात रूपांतर करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाला दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी मिळावी तसेच भविष्यातील वाढत्या गरजा लक्षात घेऊन आरोग्य पायाभूत सुविधांचा विस्तार व्हावा, या उद्देशाने या मागण्या करण्यात आल्याचे आमदार अमोल पाटील यांनी स्पष्ट केले. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दोन्ही मागण्यांकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहण्याचे आश्वासन देत संबंधित विभागामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. आरोग्य सुविधा हा ग्रामीण विकासाचा महत्त्वाचा पाया असून एरंडोल-पारोळा मतदारसंघातील नागरिकांना आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, अशी ग्वाही आमदार अमोल पाटील यांनी दिली.


# पत्रकार संघाच्या उत्तर महाराष्ट्र विभाग कार्याध्यक्षपदी अबरार मिर्झा

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी:** पत्रकारांच्या हक्कांसाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई या राज्यस्तरीय संघटनेने *'महाराष्ट्र चौफेर'*चे संपादक अबरार बेग सरवर बेग मिर्झा यांची उत्तर महाराष्ट्र विभाग कार्याध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती २ ऑगस्ट २०२६ पासून पुढील ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करण्यात आली असून, नियुक्तीपत्रावर राज्य कार्याध्यक्ष प्रविण सपकाळे यांची स्वाक्षरी आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. पत्रकारिता क्षेत्रात सातत्याने सक्रिय राहून समाजहिताच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणारे तसेच 'महाराष्ट्र चौफेर' या वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकाभिमुख पत्रकारिता करणारे अबरार मिर्झा यांच्यावर उत्तर महाराष्ट्रातील संघटनात्मक कार्य अधिक बळकट करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीनंतर उत्तर महाराष्ट्रातील जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील पत्रकारांना संघटित करणे, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी प्रभावी लढा उभारणे, पत्रकारांच्या विविध समस्या शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविणे, नवोदित पत्रकारांना संघटनेशी जोडणे आणि संघटनेचा विस्तार करून पत्रकारांमध्ये ऐक्याची भावना दृढ करणे, या जबाबदाऱ्या त्यांच्याकडे सोपविण्यात आल्या आहेत. संघटनेची उद्दिष्टे, नियम आणि धोरणांचे पालन करत पत्रकारांच्या हितासाठी प्रामाणिकपणे व निष्ठेने कार्य करण्याची अपेक्षा नियुक्तीपत्रातून व्यक्त करण्यात आली आहे. अबरार मिर्झा यांच्या नेतृत्वामुळे उत्तर महाराष्ट्रात संघटनेचे कार्य अधिक व्यापक, प्रभावी आणि गतिमान होईल, असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीचे पत्रकार, सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केले असून, अबरार मिर्झा यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पत्रकारांच्या सन्मान, सुरक्षा, हक्क आणि कल्याणासाठी ते प्रभावी नेतृत्व करतील, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

# धुळ्यात दूषित पाण्याच्या पुरवठ्याने नागरिकांमध्ये चिंता

## पाणी उकळूनच पिण्याचे मनपाचे आवाहन



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे शहरातील विविध भागांमध्ये दूषित पाण्याचा पुरवठा झाल्याच्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अलीकडील मुसळधार पावसानंतर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ व माती मिसळल्याने पाण्याचा रंग बदलल्याची बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने नागरिकांना खबरदारीचा उपाय म्हणून पाणी उकळूनच पिण्याचे आवाहन केले आहे. धुळे शहरासह जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे तापी नदी व अक्कलपाडा धरणाच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली. पुराच्या पाण्यासोबत मोठ्या प्रमाणात माती व गाळ धरणात मिसळल्याने शहराला होणाऱ्या पाणीपुरवठ्यावर त्याचा परिणाम झाल्याचे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे. यासंदर्भात माहिती देताना महापालिकेचे कार्यकारी अभियंता नवनीत सोनवणे यांनी सांगितले की, पुराच्या पाण्यात मातीचे प्रमाण वाढल्याने काही भागांमध्ये दूषित स्वरूपाचे पाणी पोहोचले आहे. मात्र, पाणी शुद्धीकरण केंद्रावर आवश्यक प्रक्रिया करूनच पाणीपुरवठा केला जात असून परिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष आहे.
नागरिकांना अधिक स्वच्छ पाणी मिळावे यासाठी अतिरिक्त शुद्धीकरण प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, नागरिकांनी कोणतीही अफवा किंवा भीती बाळगू नये, असे आवाहनही मनपाने केले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून पिण्याच्या पाण्यात जीवन ड्रॉपचे दोन थेंब टाकावेत, आवश्यक असल्यास तुरटीचा वापर करावा आणि पाणी उकळूनच सेवन करावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता नवनीत सोनवणे यांनी केले आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महापालिकेचे पथक सातत्याने काम करत असून, शुद्ध पाण्याचा पुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना सुरू असल्याची माहितीही प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सावधगिरी बाळगणे आवश्यक असल्याने, पिण्याच्या पाण्याबाबत आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# व्हॉईस ऑफ मीडिया महाराष्ट्रची नूतन प्रदेश कार्यकारिणी जाहीर!

## ठाणेतील सुरेश जगताप व ॲड. नीतू विश्वकर्मा यांना राज्यस्तरीय जबाबदारी

जन सम्राट टाईम्स





**नवी दिल्ली | प्रतिनिधी :**
पत्रकारांच्या हक्कांसाठी देश-विदेशात कार्यरत असलेल्या व्हॉईस ऑफ मीडिया (VOM) इंटरनॅशनल फोरमच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची घोषणा दिल्ली येथे पार पडलेल्या दोन दिवसीय राज्य अधिवेशनात करण्यात आली. संघटनेचे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे आणि राष्ट्रीय अध्यक्ष अनिल मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. अनुभवी, अभ्यासू आणि नवोदित पदाधिकाऱ्यांचा समतोल राखत राज्यातील सर्व विभाग व जिल्ह्यांना प्रतिनिधित्व देणारी कार्यकारिणी जाहीर करण्यात आल्याने पत्रकारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नव्या कार्यकारिणीत विजय चोरडिया यांची महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विभागीय प्रदेशाध्यक्ष म्हणून अजितदादा कुंकलोळ आणि नरेंद्र देशमुख यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली. कार्याध्यक्षपदी मिलिंद टोके आणि महेश पांचाळ, राज्य सरचिटणीसपदी गजानन देशमुख व सचिन मोहिते, तर राज्य उपाध्यक्षपदी संगम कोटलवार, चंद्रशेखर भोयर, अभिजीत दरेकर आणि गणेश जैन यांची निवड करण्यात आली.

राज्य संघटक म्हणून लक्ष्मण बगाडे, राहुल धोका, जयेश काटे आणि इर्शाद शेख यांची नियुक्ती झाली असून, कार्यवाहक म्हणून तानाजी घोडके, वैभव मोहिते, अमित बागडे, संजय तीपाले, राजू कापसे, गजानन बाजारे, अशोक मिश्रा, मुकुंद जोशी, अनिल चव्हाण आणि रखमाजी सुपारे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रवक्तेपदी नरेश पाटील, प्रमोद पानबुडे, रुपेश जाधव आणि आशिष शेंडगे, तर खजिनदार म्हणून गायत्री ढवळे आणि परेश राऊत यांची नियुक्ती करण्यात आली.

या कार्यकारिणीतील विशेष बाब म्हणजे ठाणे जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार सुरेश जगताप यांची राज्य सहसंघटक म्हणून, तर ॲड. नीतू विश्वकर्मा यांची राज्य संयोजक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या दोन्ही नियुक्त्यांमुळे ठाणे जिल्ह्याच्या पत्रकारितेला राज्यस्तरावर महत्त्वाचे प्रतिनिधित्व मिळाल्याची भावना पत्रकारांमध्ये व्यक्त होत असून, विविध सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.,याशिवाय सहसंघटक म्हणून अहमद नूर, समीर माडेश्वर आणि अनिल करंदकर, सहसरचिटणीस म्हणून प्रशांत गोडसे, धनंजय कपाले, गुरुदास गुरुमुळे आणि ओंकार हिंगमिरे, तर सहकार्यवाहक म्हणून मलिकार्जुन धारूरकर, दीपक ढवळे, अरुण मोडक आणि शेख लाल शेख यांची निवड करण्यात आली आहे. राज्य संयोजक म्हणून गोरक्षनाथ नेहे, राकेश कलाल, रियाज मुल्ला, संजय घेवारे, सोमनाथ पवार, महेंद्र पवार, मनोज कामंडी, संतोष चराटे आणि अब्दुल आतिक यांचाही समावेश करण्यात आला आहे.

यावेळी पदाधिकाऱ्यांनी पत्रकारांच्या प्रश्नांवर अधिक प्रभावीपणे काम करण्याचा, संघटनेचा विस्तार राज्याच्या कानाकोपऱ्यात करण्याचा आणि पत्रकारांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी संघटनेला अधिक सक्षम बनविण्याचा संकल्प व्यक्त केला. पत्रकारिता क्षेत्रातील सामाजिक बांधिलकी, व्यावसायिक सक्षमीकरण आणि संघटनात्मक एकजूट वाढविण्यासाठी नव्याने जाहीर झालेली ही कार्यकारिणी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# महापौर अश्विनी निकम यांची पुरग्रस्त भारतनगरला भेट!

## कानसई नाल्यावरील कायमस्वरूपी उपाययोजनांचे निर्देश

जन सम्राट टाईम्स



**उल्हासनगर | प्रतिनिधी**
उल्हासनगर-४ येथील कानसई नाल्यालगतच्या भारतनगर परिसरात मुसळधार पावसामुळे २ ऑगस्टच्या मध्यरात्री भीषण पूरस्थिती निर्माण झाली. पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास नाल्याचे पाणी थेट घरांमध्ये शिरल्याने अनेक कुटुंबांची मोठी तारांबळ उडाली. घरातील जीवनावश्यक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, नागरिकांना रात्रभर जीव मुठीत धरून परिस्थितीचा सामना करावा लागला.

विशेष म्हणजे, पावसाळ्यापूर्वीच कानसई नाल्यालगतचा परिसर जलमय होण्याची शक्यता स्थानिक प्रसारमाध्यमांमधून अधोरेखित करण्यात आली होती. त्यानुसार वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना झाल्या असत्या, तर आजची गंभीर परिस्थिती टाळता आली असती, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली.

पूरस्थितीची माहिती मिळताच स्थानिक नगरसेविका सुरेखा सोनवणे, नगरसेवक विकास खरात आणि समाजसेवक सुरेश सोनवणे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत नागरिकांना दिलासा दिला. त्यांनी महानगरपालिकेच्या महापौर अश्विनी निकम आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने घटनास्थळी बोलावून परिस्थितीची माहिती दिली.

महापौर अश्विनी निकम यांनी अधिकाऱ्यांसह संपूर्ण परिसराची पाहणी करत नाल्याचे पाणी घरांमध्ये कोणत्या मार्गाने शिरले, किती नुकसान झाले आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत, याची सविस्तर माहिती घेतली. त्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

भारतनगर परिसरात दरवर्षी पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होत असल्याने स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. यावेळी नागरिकांनी कानसई नाल्यालगत मजबूत संरक्षण भिंत उभारणे, नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करणे, तसेच दीर्घकालीन पूरनियंत्रण आराखडा तयार करणे या प्रमुख मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.

यावेळी समाजसेवक कैलास शिरसाठ, मारुती पाटोळे, चंद्रशेखर शेट्टी, गौतम खंडागळे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. त्यांनी पुरामुळे झालेल्या नुकसानीची माहिती प्रशासनाला देत, भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी केली.

स्थानिकांच्या मते, दरवर्षी पावसाळ्यानंतर पाहणी, पंचनामे आणि आश्वासनांचा सिलसिला सुरू होतो; मात्र प्रत्यक्षात कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने नागरिकांना वारंवार संकटाचा सामना करावा लागतो. त्यामुळे यावेळी केवळ आश्वासनांवर न थांबता ठोस कृती आराखडा राबविण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

पूरग्रस्त भारतनगरची पाहणी करून महापौर अश्विनी निकम यांनी प्रशासनाला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिल्याने नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला, तरी कानसई नाल्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा कधी निघणार, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# बाबा चिवडा' उद्योगात भीषण आग

## अग्निशमन दलाच्या तत्परतेने दुर्घटना टळली

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव एमआयडीसी परिसरातील सुप्रसिद्ध 'बाबा चिवडा' उद्योगात सोमवारी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीची माहिती मिळताच एमआयडीसी अग्निशमन उपकेंद्राचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी युद्धपातळीवर बचावकार्य हाती घेत अल्पावधीतच आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे मोठी दुर्घटना आणि कोट्यवधी रुपयांचे संभाव्य नुकसान टळल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला. आग लागल्याचे वृत्त मिळताच अग्निशमन विभागाने तात्काळ प्रतिसाद देत घटनास्थळी अग्निशमन बंब व आवश्यक यंत्रणा रवाना केली. आग वेगाने पसरत असतानाही जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून ती इतर भागात पसरण्यापासून रोखली. त्यामुळे आजूबाजूच्या औद्योगिक युनिट्सनाही कोणताही धोका निर्माण झाला नाही. या बचाव मोहिमेत वाहनचालक यूसुफ पटेल, मयुर ओतारी आणि शोएब तडबी यांनी अग्निशमन वाहने आणि यंत्रणा योग्य वेळी घटनास्थळी पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच फायरमन योगेश कोल्हे, राकेश सोनवणे, इकबाल तडवी, राकेश पाटील, विक्की सोनवणे आणि सतार तडवी यांनी जीवाची पर्वा न करता धाडसीपणे आग विझविण्याचे काम केले. अग्निशमन दलाच्या तत्पर आणि समन्वयपूर्ण कारवाईमुळे आग अल्पावधीत नियंत्रणात आली. त्यामुळे उद्योग परिसरातील इतर युनिट्स आणि साहित्य सुरक्षित राहिले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नसली, तरी आर्थिक नुकसानीचा अंदाज संबंधित यंत्रणांकडून घेतला जात आहे. दरम्यान, आग नेमकी कशामुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शॉर्ट सर्किट किंवा अन्य तांत्रिक बिघाडामुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# पाडवी नूतन विद्यालयात टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

## वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे चि. फ. आर. आर. पाडवी नूतन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, धुळे येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यानिमित्त विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य के. जी. गर्दे होते. व्यासपीठावर पर्यवेक्षिका सौ. पी. व्ही. पाटील, ज्येष्ठ शिक्षक जे. जी. बागुल यांच्यासह शिक्षक-शिक्षिका उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक जे. जी. बागुल आणि प्रमुख वक्ते संदीप शेलार यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्याला चालना देण्यासाठी इयत्ता ५ वी ते ६ वी, ७ वी ते ८ वी आणि ९ वी ते १० वी अशा तीन गटांत स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण १२ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. प्रमुख वक्ते संदीप शेलार यांनी लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या राष्ट्रप्रेम, सामाजिक कार्य आणि साहित्यिक योगदानाचा प्रेरणादायी आढावा विद्यार्थ्यांसमोर मांडला.स्पर्धेचा निकाल बी. सी. पाटील यांनी जाहीर केला. पहिल्या गटात आनंद चौरे प्रथम, तर प्रेमल नाईक द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले. दुसऱ्या गटात उमेश गर्दे प्रथम, तर कार्तिक गवळे द्वितीय आले. तिसऱ्या गटात मनलेश ठाकरे यांनी प्रथम, तर चंदन वळवी यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. विजेत्या विद्यार्थ्यांचा प्राचार्य व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य देऊन गौरव करण्यात आला. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना संस्कृत शिक्षिका सौ. सोनाली ठाकरे यांच्या वतीने पेन भेट देऊन प्रोत्साहित करण्यात आले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य के. जी. गर्दे यांनी लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा विद्यार्थ्यांनी अंगीकार करून समाजसेवा, शिक्षण आणि राष्ट्रप्रेमाची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. त्यांनी सर्व स्पर्धकांचे कौतुक करून विजेत्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. सी. पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. सोनाली ठाकरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# भिल्ल वस्तीला दिलासा; विजय सोनवणे यांच्याकडून संसारोपयोगी वस्तूंचे वाटप

## मुसळधार पावसामुळे नुकसानग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात

जन सम्राट टाईम्स



**ममूराबाद | प्रतिनिधी:** ममूराबाद गावात झालेल्या अतिवृष्टीमुळे भिल्ल वस्तीतील अनेक कुटुंबांचे मोठे नुकसान झाले असून, घरांची पडझड, अन्नधान्य व संसारोपयोगी वस्तूंची नासधूस झाल्याने अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. या संकटाच्या काळात सामाजिक कार्यकर्ते विजय भाऊ सोनवणे यांनी पुढाकार घेत आपत्तीग्रस्त कुटुंबांना संसारोपयोगी वस्तूंचे किट वाटप करून दिलासा दिला.

मुसळधार पावसामुळे लेंडी नाल्याला आलेल्या पुराचा सर्वाधिक फटका भिल्ल वस्तीला बसला.

अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने जीवनावश्यक साहित्य वाहून गेले, तर काही घरांचे मोठे नुकसान झाले. या परिस्थितीची दखल घेत विजय भाऊ सोनवणे यांनी तातडीने मदतीचा उपक्रम राबवत गरजू कुटुंबांपर्यंत आवश्यक वस्तूंचे किट पोहोचविले. वाटप करण्यात आलेल्या किटमध्ये दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेल्या विविध संसारोपयोगी वस्तूंचा समावेश होता. या मदतीमुळे पूरग्रस्त कुटुंबांना नव्याने संसार उभा करण्यासाठी मोठा आधार मिळाला. संकटाच्या काळात समाजाने समाजासाठी धावून जाण्याचा आदर्श या उपक्रमातून पाहायला मिळाला. यावेळी गावचे सरपंच हेमंत चौधरी, ग्रामपंचायत सदस्य गोपालभाऊ मोरे, निखिल भाऊ पाटील, आशा सेविका लक्ष्मी आत्या यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


उपस्थित मान्यवरांनी विजय भाऊ सोनवणे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी बोलताना विजय भाऊ सोनवणे म्हणाले, "नैसर्गिक आपत्ती टाळणे आपल्या हातात नसले तरी संकटात सापडलेल्या बांधवांना मदतीचा हात देणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. ही मदत मोठी नसली तरी संकटग्रस्त कुटुंबांना धीर देण्याचा आणि त्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी बळ देण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. समाजाच्या सुख-दुःखात आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहू." या मदत उपक्रमाबद्दल भिल्ल वस्तीतील नागरिकांनी विजय भाऊ सोनवणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

प्रशासकीय मदतीबरोबरच सामाजिक स्तरावरही अशा प्रकारचे मदतीचे उपक्रम राबविले गेल्यास आपत्तीग्रस्त कुटुंबांना मोठा दिलासा मिळू शकतो, अशी भावना यावेळी नागरिकांनी व्यक्त केली.

# ऑटो रिक्षा, शालेय व्हॅनच्या भाडेदर पुनर्निर्धारणाची मागणी

## वीर सावरकर रिक्षा युनियनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

जन सम्राट टाईम्स



**जळगाव| प्रतिनिधी :** इंधन दरवाढ, वाहन देखभाल खर्च आणि वाढत्या महागाईमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या ऑटो रिक्षा, शालेय व्हॅन व स्कूल बस चालकांना दिलासा देण्यासाठी प्रवासी व विद्यार्थी वाहतूक भाडेदरांचे तातडीने पुनर्निर्धारण करण्यात यावे, अशी मागणी वीर सावरकर रिक्षा युनियन, जळगाव यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिवहन प्राधिकरण (DTA) अध्यक्ष यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

युनियनचे जिल्हाध्यक्ष दिलीपभाऊ सपकाळे यांनी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या काही वर्षांत सीएनजी, एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्याचबरोबर वाहनांचे सुटे भाग, विमा, टायर, फिटनेस, कर, दुरुस्ती आणि देखभाल खर्चातही सातत्याने वाढ होत आहे. मात्र, या वाढीच्या तुलनेत रिक्षा व शालेय वाहतूक भाडेदरांमध्ये कोणतीही सुधारणा करण्यात आलेली नाही. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, एलपीजीचे दर पूर्वी सुमारे ५३ रुपये प्रति लिटर होते. विविध कारणांमुळे ते १२५ रुपये प्रति लिटरपर्यंत पोहोचले होते आणि सध्या देखील सुमारे ९० रुपये प्रति लिटर आहेत. त्यामुळे वाहनचालकांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम झाला असून अनेकांना कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले आहे. रिक्षाचालक नागरिकांना सातत्याने सेवा देत असले तरी किरकोळ भाडेवाढ केली तरी त्यांच्यावर टीका होते. मात्र, त्यांच्या वाढत्या खर्चाचा विचार शासन आणि संबंधित यंत्रणांकडून केला जात नसल्याची खंतही निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. युनियनने जिल्हा परिवहन प्राधिकरणाची तातडीने बैठक बोलावून ऑटो रिक्षा, शालेय व्हॅन आणि स्कूल बसच्या प्रवासी व विद्यार्थी वाहतुकीसाठी वास्तववादी भाडेदर निश्चित करावेत, अशी मागणी केली आहे. तसेच नवीन दरांना त्वरित मंजुरी देऊन त्याबाबत अधिकृत अधिसूचना प्रसिद्ध करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा जिल्हा परिवहन प्राधिकरणाचे सचिव आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाही देण्यात आल्या आहेत. रिक्षाचालकांच्या प्रश्नांकडे शासनाने संवेदनशीलतेने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा युनियनने व्यक्त केली आहे.

# ४० हजारांची लाच स्वीकारताना पोलीस कर्मचारी एसीबीच्या जाळ्यात

## कोर्टात सकारात्मक अहवाल पाठवण्यासाठी ₹५० हजारांची मागणी; पश्चिम देवपूर पोलीस ठाण्याच्या आवारात रंगेहात कारवाई

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** धुळे जिल्हा पोलीस दलात मोठी खळबळ उडवणारी कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केली आहे. पश्चिम देवपूर पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) आणि एका पोलीस कर्मचाऱ्याला ₹४० हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. पोलीस ठाण्याच्या आवारातच झालेल्या या कारवाईमुळे पोलीस दलातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरला आहे. एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, गृहकर्जाशी संबंधित एका प्रकरणात तक्रारदाराच्या सासऱ्यांच्या बाजूने आरोपीविरुद्ध न्यायालयात सकारात्मक अहवाल पाठवण्यासाठी ₹५० हजारांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती. तडजोडीनंतर ही रक्कम ₹४० हजारांवर निश्चित करण्यात



आली. ही रक्कम स्वीकारताना एसीबीच्या पथकाने सापळा रचून दोघांनाही रंगेहात अटक केली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक साईनाथ भानुदास तळेकर (वय ३६) आणि पोलीस कर्मचारी अविनाश अरविंद सादरे (वय ३१) यांना पश्चिम देवपूर पोलीस ठाण्याच्या आवारातच ताब्यात घेण्यात आले. पोलीस ठाण्याच्या परिसरातच ही कारवाई झाल्याने जिल्हाभरात खळबळ उडाली असून, पोलीस दलाच्या प्रतिमेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास धुळे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरू आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, पोलीस उपअधीक्षक प्रदीप मैराळे आणि पोलीस उपअधीक्षक कविता फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस उपअधीक्षक सचिन साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक यशवंत बोरसे, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, रामदास बारेला, प्रवीण पाटील आणि मकरंद पाटील यांचा समावेश असलेल्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. या घटनेनंतर पोलीस दलात भ्रष्टाचाराविरोधात अधिक कठोर कारवाईची गरज असल्याची चर्चा सुरू झाली असून, एसीबीच्या या धडक कारवाईचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.

# आरटीओच्या वाहन तपासणीदरम्यान भीषण अपघात?

## ट्रॉलाने चार-पाच वाहनांना चिरडले; एकाचा मृत्यू, दोघे गंभीर जखमी

जन सम्राट टाईम्स



**धुळे। प्रतिनिधी:** धुळे–चाळीसगाव महामार्गावरील चाळीसगाव चौफुली परिसरात मंगळवारी झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर पती-पत्नी गंभीर जखमी झाले. भरधाव ट्रॉलाने चार ते पाच वाहनांना जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला. या संपूर्ण घटनेचा थरार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, अपघातानंतर प्रादेशिक परिवहन विभागाच्या (आरटीओ) अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरटीओ अधिकाऱ्यांनी महामार्गावर एका अवजड ट्रॉला वाहनाला तपासणीसाठी थांबवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर काही क्षणांतच भरधाव ट्रॉलाचे नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील चार ते पाच वाहनांना जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की काही वाहनांचा अक्षरशः चुराडा झाला. या अपघातात मालेगाव येथील पिकअप चालक सोमनाथ बाबुलाल चव्हाण (वय ३०) यांचा जागीच मृत्यू झाला. ते बियाण्यांची वाहतूक करत असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच नाशिक येथील विजय पाटील आणि त्यांच्या पत्नी गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेत पिकअप, कारसह अन्य वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघातानंतर घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, अपघातातून बचावलेल्या काही प्रवाशांनी आणि प्रत्यक्षदर्शींनी आरटीओ अधिकाऱ्यांनी अवजड वाहन अडविण्याची पद्धत चुकीची होती, असा आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अचानक वाहन थांबविण्याचा प्रयत्न झाल्याने ट्रॉला चालकाचे नियंत्रण सुटले आणि पुढील वाहनांना धडक बसली. या आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून, संबंधित घटनेची निष्पक्ष चौकशी करून जबाबदारांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अपघाताची माहिती मिळताच चाळीसगाव रोड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. अपघातग्रस्त वाहने बाजूला करून महामार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली. पोलिसांकडून अपघाताचे नेमके कारण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील तपास सुरू आहे.

# सुरेशआप्पा पाटील यांना राज्यस्तरीय 'आदर्श सरपंच' पुरस्कार

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील झुरखेडा गावचे लोकनियुक्त सरपंच सुरेशआप्पा पाटील यांना ग्रामविकासातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'आदर्श सरपंच' हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. नालंदा ऑर्गनायझेशन, पुणे यांच्या वतीने आयोजित 'राज्यस्तरीय सह्याद्रीरत्न गुणगौरव सन्मान सोहळा – २०२६' मध्ये त्यांचा सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार सोहळा १ ऑगस्ट २०२६ रोजी पुण्यातील पत्रकार भवन, नवी पेठ येथे उत्साहात पार पडला. सामाजिक, राजकीय, आरोग्य, शिक्षण, कला, उद्योग, सेवा आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला. समाजात सकारात्मक आणि परिवर्तनशील कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात एआरजे एशिया ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष जितेंद्र तुळशीराम दाते तसेच 'देऊळ बंद' चित्रपटातील अभिनेत्री आर्या घारे यांच्या हस्ते सुरेशआप्पा पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. झुरखेडा गावात लोकसहभागातून राबविण्यात आलेली विकासकामे, पारदर्शक प्रशासन, ग्रामविकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, लोकाभिमुख कारभार आणि विविध सामाजिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी याची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्कारामध्ये सन्मानचिन्ह, मानपत्र आणि मेडल प्रदान करण्यात आले. या राज्यस्तरीय सन्मानामुळे झुरखेडा गावासह धरणगाव तालुका आणि जळगाव जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.